IRBK-0109780

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा० वा०
ग्रं. क्र. ९७८०





# कुर्यात् सदा मंगलम्

यांस

मौंजीबंधनानिमित्त

स प्रे म भे ट

卐 卐 卐

यां ज क डू न

मिति

दिनांक

कुर्यात् बटो मंगलम्

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

IRBK-01097800

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मुंजा मुलाचें पूर्ण नांव चि. ____________________

वडिलांचें पूर्ण नांव श्री. ____________________

मुंज लागल्याची मिति आणि वेळ ____________________

मुंज लागल्याचें ठिकाण, गांव इ. ____________________

मुंज लावणाऱ्या पुरोहितांचें नांव ____________________

मुंजीला आलेल्या महत्त्वाच्या व्यक्ति ____________________

मुंजा मुलाचें गोत्र __________ प्रवर __________ शाखा __________

मुंजा मुलाचें मुंजींतील नांव __________ मुंजीच्या वेळचें वय __________

विशेष उल्लेख :

# कुर्यात् बटोर्मङ्गलम्

卐 卐 卐

लेखक : वा. ल. वझे

卐

मूल्य सव्वा रुपया

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 32515
विभाग
क्रमांक
नों. दि. 23.3
वाचनालय शाखा

गोकुळ मासिक प्रकाशन, पुणें २

कुर्यात् बटोर्मंगलम् ३

कु र्या त् व टा मं ग ल म् ४

गो : ३ – मा. ८३

●

© १९६२
गोकुळ मासिक प्रकाशन

●

आवृत्ति पहिली
माघ शके १८८३
फेब्रुवारी १९६२

●

मूल्य रु. १–२५

●

प्रकाशक :
सौ. मंगला गाडगीळ
गोकुळ मासिक प्रकाशन
यांचेकरितां
११९४ सदाशिव पेठ, पुणें २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ, पुणें २

# आ शी र्वा द

मित्रा, तुझी मुंज झाली म्हणजे काय झालें तें सांगण्यासाठींच हें पुस्तक तुझ्या हातीं दिलें जात आहे.

मित्रा, संस्कारांचें सामर्थ्य पुस्तकांत वाचून तुला कसें बरें समजणार ? त्यासाठीं तूं स्वतःवर मनापासून संस्कार करून घे; आणि मग बघ त्यांच्या सामर्थ्यानें तुझ्या जीवनांत केवढें ओज, तेज प्राप्त होतें तें.

मित्रा, अंधश्रद्धा ही जितकी वाईट तितकाच श्रद्धेचा पूर्ण अभावहि अनिष्ट, अहितकर असतो हें निरंतर लक्षांत ठेव.

मौंजीबंधन झालेल्या कुमार मित्रा ! तुला सत्पुरुषांचे, परमेश्वराचें उदंड आशीर्वाद असोत अशी आम्ही अंतःकरणापासून प्रार्थना करतों. ब्राह्म-क्षात्र तेजानें, शस्त्र-शास्त्र शक्तीनें, सद्‌गुणांनीं नि ज्ञान-विज्ञानांनीं तुझें जीवन तेजस्वी नि समृद्ध होवो अशी आम्ही मनापासून इच्छा करतों.



# कुर्यात् बटोर्मङ्गलम्

पांढरा पंचा कमरेभोंवतीं गुंडाळलेला; अंगावर पिवळा पंचा पांघरलेला; कमरेला दोरी, गळ्यांत जानवें, हातांत दंड आणि नारळ घेतलेला, असा अरुण गुरुजींपाशीं उपदेश घेण्याकरितां आला. गुरुजींपुढें नारळ ठेवून त्यानें गुरुजींना नमस्कार केला. मग तो म्हणाला, “ गुरुजी मला उपदेश द्या. ”

गुरुजींनीं त्याला आपणासमोर बसवून घेतलें आणि ते म्हणाले, “ अरुण, आज हा एवढा मोठा थाटमाट चालला आहे तो कशाकरितां बरें ? ”

**अरुण** – कशाकरितां म्हणजे ? माझ्या मुंजीकरितां.

**गुरुजी** – मुंज म्हणजे रे काय ?

कुर्यात् वटा मंगलम् ४

गो : ३ – मा. ८३

●

© १९६२
गोकुळ मासिक प्रकाशन

●

आवृत्ति पहिली
माघ शके १८८३
फेब्रुवारी १९६२

●

मूल्य रु. १–२५

●

प्रकाशक :
सौ. मंगला गाडगीळ
गोकुळ मासिक प्रकाशन
यांचेकरितां
११९४ सदाशिव पेठ, पुणें २

●

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ, पुणें २

# आशीर्वाद

मित्रा, तुझी मुंज झाली म्हणजे काय झालें तें सांगण्यासाठींच हें पुस्तक तुझ्या हातीं दिलें जात आहे.

मित्रा, संस्कारांचें सामर्थ्य पुस्तकांत वाचून तुला कसें बरें समजणार ? त्यासाठीं तूं स्वतःवर मनापासून संस्कार करून घे; आणि मग बघ त्यांच्या सामर्थ्यानें तुझ्या जीवनांत केवढें ओज, तेज प्राप्त होतें तें.

मित्रा, अंधश्रद्धा ही जितकी वाईट तितकाच श्रद्धेचा पूर्ण अभावहि अनिष्ट, अहितकर असतो हें निरंतर लक्षांत ठेव.

मौंजीबंधन झालेल्या कुमार मित्रा ! तुला सत्पुरुषांचे, परमेश्वराचें उदंड आशीर्वाद असोत अशी आम्ही अंतःकरणापासून प्रार्थना करतों. ब्राह्म-क्षात्र तेजानें, शस्त्र-शास्त्र शक्तीनें, सद्गुणांनीं नि ज्ञान-विज्ञानांनीं तुझें जीवन तेजस्वी नि समृद्ध होवो अशी आम्ही मनापासून इच्छा करतों.

# कुर्यात् बटोर्मङ्गलम्



पांढरा पंचा कमरेभोंवतीं गुंडाळलेला; अंगावर पिवळा पंचा पांघरलेला; कमरेला दोरी, गळ्यांत जानवें, हातांत दंड आणि नारळ घेतलेला, असा अरुण गुरुजींपाशीं उपदेश घेण्याकरितां आला. गुरुजींपुढें नारळ ठेवून त्यानें गुरुजींना नमस्कार केला. मग तो म्हणाला, " गुरुजी मला उपदेश द्या. "

गुरुजींनीं त्याला आपणासमोर बसवून घेतलें आणि ते म्हणाले, " अरुण, आज हा एवढा मोठा थाटमाट चालला आहे तो कशाकरितां बरें ? "

**अरुण** – कशाकरितां म्हणजे ? माझ्या मुंजीकरितां.

**गुरुजी** – मुंज म्हणजे रे काय ?

**अरुण** – आज माझ्या गळ्यांत जानवें घातलें. चौघडा, बॅण्ड वगैरे वाद्यें वाजलीं. मंगलाष्टकें म्हटलीं. आतां दुपारीं जेवण होईल. संध्याकाळीं मोटारींतून भिक्षावळ निघेल. म्हणजे झाली माझी मुंज.

गुरुजी मोठ्यानें हसले. अरुण ओशाळला. तो थोड्या वेळानें गुरुजींना म्हणाला, “मला नाहीं सांगतां येत मुंज म्हणजे काय तें. तुम्हीच सांगा. आतांपर्यंत तुम्ही जें जें सांगितलेंत तसें मीं केलें. तुम्ही जे मंत्र म्हटलेत आणि मलाहि म्हणायला सांगितलेत त्यांतलें एक अक्षरहि मला समजलें नाहीं. आतां सांगाच मला मुंज म्हणजे काय तें. सगळें सगळें सांगा हं.”

## मुंज म्हणजे काय ?

**गुरुजी** – मुंज म्हणजे काय हें पुष्कळांना माहीत नसतें. मुंज म्हणजे दर्भाची विणलेली दोरी. आतां तुझ्या कमरेला बांधली आहे ना, तीच. ती ज्या संस्कारानें बांधतात त्यास ‘मौंजीबंधन’ असें म्हणतात. या संस्काराचें खरें नांव आहे ‘उपनयन’. उप म्हणजे जवळ आणि नयन म्हणजे नेणें. आपणां सर्वांचा मूळ पुरुष जो प्रजापति त्याच्याजवळ नेणें; म्हणजे मातापित्यांनीं आपला मुलगा प्रजापति किंवा गुरु यांना अर्पण करणें.

**अरुण** – पण गुरुजी, आई-वडिलांनीं मुलगा गुरूला कशाकरितां अर्पण करायचा हो ?

**गुरुजी** – मुलाला सर्व प्रकारचें शिक्षण मिळावें म्हणून. आजपर्यंत तूं वेळीं अवेळीं खाणें खाल्लेंस. वाटेल तिथें हिंडलास. सकाळीं आठ आठ वाजेपर्यंत झोंपलास, खोटेंनाटें बोललास; या सर्व गोष्टी आजपासून बंद झाल्या. वाटेल तसें वागल्यानें, खोटेंनाटें बोलल्यानें पाप लागतें. बालवयांत प्रत्येकाच्या हातून असेंच घडतें. तुझ्याकडूनाहि असेंच आचरण झालें. त्या पातकांचा नाश व्हावा म्हणून आज सकाळींच तुला मी आचमन करायला लावून "**मम कामचार कामवाद कामभक्षणादि दोषापनोदार्थ**" – म्हणजे इच्छेस वाटेल तसें वागणें, बोलणें, खाणें यापासून झालेल्या पापनाशाकरितां तुला प्रायश्चित्त दिलें. बोलण्याला, खाण्याला, झोंपेला मर्यादा पाहिजे. त्याशिवाय आरोग्य नि विद्या साधणार नाहीं. विद्येशिवाय आनंद, कीर्ति, पैसा नाहीं आणि आरोग्याशिवाय सुख नाहीं.

**अरुण** – पण याचा विचार इतक्या लहानपणीं कशाला ?

**गुरुजी** – बालवयांत मुलांना वाईट संवयी लागतात. बालमनावर लगेच वाईट गोष्टींचा परिणाम होतो. कारण त्यांचें शरीर कोवळें तसेंच मनाहि कोवळें असतें. म्हणून लहानपणांतच सर्व व्यसनांपासून दूर राहिलें पाहिजे. शरीर बळकट केलें पाहिजे. असें केल्यानें मनाला उत्साह मिळतो. शरीराची वाढ करून तें मजबूत बनविणें हा सर्व आयुष्याचा पाया आहे. तो

वयाच्या पंचवीस वर्षांपर्यंत भरावयाचा असतो. पायाच जर मजबूत नसेल तर त्यावर इमारत कशी टिकेल ?

**अरुण** – पण याचा मुंजीशीं काय संबंध गुरुजी ?

**गुरुजी** – आज सकाळपासून मुंजीसंबंधीं तुला आणि तुझ्या वडिलांना मीं काय काय करावयास सांगितलें, मीं मंत्र कोणते म्हटले, त्यांचा अर्थ काय, हें सर्व थोडक्यांत मी तुला सांगतों. लक्ष देऊन ऐक. म्हणजे या गोष्टींचा मुंजीशीं संबंध काय हें तुला समजून येईल.

## मुंजविधीचा प्रारंभ

**गुरुजी** – आई-वडिलांचें व तुझें म्हणजे मुंजा मुलाचें मंगलस्नान झालें. सोवळीं नेसून तुम्ही पाटावर येऊन बसलांत.

**अरुण** – होय गुरुजी.

**गुरुजी** – तुझ्या वडिलांनीं दोनदां आचमन केलें. सर्व देवतांचें स्मरण करून थोर माणसांना नमस्कार केला. देशकाल म्हणजे आजची तिथि, वार, नक्षत्र, योग यांचा उच्चार करून तुझी मुंज लावण्याचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणून बारा हजार गायत्री-जप करण्याचा संकल्प केला. त्याच गायत्री-मंत्राचा उपदेश तुझ्या वडिलांनीं तुला दिला. वडील हे पहिले

गुरुजी. त्यांच्याचकडून हा उपदेश घ्यावयाचा असतो. त्यानंतर तुला आचमन करायला लावून तुझ्याकडून 'मम कामचार कामवाद ...' हें म्हणवून घेतलें. आजपर्यंत घडलेल्या दोषांचें निरसन व्हावें म्हणून प्रायश्चित्त-विधि उरकून घेतला. गणपतिपूजन केलें.



## पुण्याहवाचन

**अरुण** – गणपति-पूजनानंतर 'स्वस्ति' 'स्वस्ति' म्हणून, गुरुजी, तुम्ही आमच्या डोक्यावर अक्षता टाकल्यात तें काय ?

**गुरुजी** – त्याला पुण्याहवाचन म्हणतात. गणपतिपूजन तसेंच पुण्याहवाचन बहुतेक

मोठ्या मंगलकार्यांच्या प्रारंभीं करतात. पुण्याहवाचनांत देवाब्राह्मणांचे आशीर्वाद घ्यावयाचे असतात.

## मंडपदेवता

**अरुण** – गुरुजी, सुपांत तुम्ही कोणते देव ठेवलेत ?


**गुरुजी** – सुपांत ना ? अरे, त्या मंडपदेवता. मंडप म्हणजे मांडव. हा जो तुझ्या मुंजी-करितां घातला आहे तोच. मांडवाच्या निरनिराळ्या भागांवर देवता स्थापन करावयाच्या असतात. त्या देवता मंगलप्रसंगीं मांडवाचें रक्षण करतात. विघ्नें येऊं देत नाहींत. त्याच मांडवावरच्या देवता आपण आपल्या सोईकरितां सुपामध्यें स्थापन करतों. शिवाय कुलदेवता वगैरेंना यामध्यें स्थान असतेंच.

घटस्थापना, अग्निस्थापना केली. तुझी हजामत करवून तुला तेल वगैरे लावून मंगलस्नान घातलें. छान छान कपडे घालून तूं तुझ्या आईबरोबर जेवावयास बसलास.

## मातृभोजन

**अरुण** – मी आईबरोबर जेवावयास बसलों त्या वेळीं आमची पुष्कळ नातेवाईक मंडळी आम्हांला पहायला जमा झाली.

दि.
शाखा



**गुरुजी** — वास्तविक तुला तुझ्या आईच्या मांडीवर बसवायला पाहिजे होतें. कारण यापुढें आईबरोबर एका ताटांत बसून जेवण करण्याचे तुझे दिवस संपले. यापुढें कुणाचेंहि उष्टें खाण्याचें बंद. कारण मुंजीनंतर तूं पवित्र, स्वावलंबी अशा ब्रह्मचर्याश्रमांत प्रवेश करणार आहेस. आईबरोबर एका ताटांत जेवण्याची ही तुला शेवटची संधि दिली बरें का, अरुण.

<u>अष्टवर्गे</u>

मुंजीनंतर बटूला विद्या शिकण्याकरितां गुरुकुलांत जावें लागतें. आई, वडील, भाऊ यांना सोडून एकदम नवीन माणसांत जाऊन रहाणें लहान मुलांना काय पण मोठ्या माणसांना देखील कठीण होतें. आपण ज्या नवीन ठिकाणीं जातों त्या ठिकाणीं आपल्या ओळखीचीं

माणसें पाहिजेत. त्याकरितां आश्रमांतील बटूंना जेवायला बोलावतात. मातृभोजनाच्या वेळींच या बटूंनाहि जेवायला मुंजा मुलाबरोबरच बसवतात. आईवडिलांना सोडून गेल्यावर आश्रमांत गुरुगृहीं मुलाला एकदम सर्व नवीन वाटूं नये म्हणून या बटूंशीं या जेवण्याच्या निमित्तानें ओळख होऊन परिचय वाढतो; आणि परिचयामुळें गुरुगृहीं रहाणें बटूला सोपें होतें. हे जे आश्रमांतील आठ बटु जेवायला बोलावतात त्यांनाच अष्टवर्गें असें म्हणतात. मुलाची मुंज आठव्या वर्षीं करावी असें शास्त्र आहे. त्यामुळेंच बहुधा आठ मुलगे बोलावण्याची प्रथा पडली असेल. आठ मिळत नसल्यास पांचाहि चालतात. मात्र हा धर्मशास्त्रांत सांगितलेला विधि नाहीं; ही केवळ रूढि आहे.



घाणा कशाकरितां भरतात ?

**अरुण** – घाणा भरणें म्हणजे हो काय, गुरुजी ?

**गुरुजी** – घाणा भरणें हा धार्मिक विधि नाहीं; ही एक स्त्रियांनीं पाडलेली रूढि आहे. घाणा म्हणजे धान्याचा कांहीं भाग घेऊन तो कांडावयाचा. दुसरा भाग घेऊन दळावयाचा म्हणजे समारंभाला लागणारें दळण-कांडण करावयाचें; आणि मुसळें वगैरे व्यवस्थित बांधून बाजूस ठेवावयाचीं. आतां हें काम गिरणींत होतें आणि दळण-कांडणाचा देखावा तेवढा होतो.

मातृभोजनानंतर तुला स्नान घातलें. सोवळ्याचीं वस्त्रें, दागिने घालून कपाळाला मंगल तिलक लावून तुला तुझ्या वडिलांसमोर होमाजवळील पाटावर आणून बसविलें. अंतरपट धरून " कुर्यात् बटोर्मंगलम् " म्हणून मंगलाष्टकें म्हटलीं व तुझ्या डोक्यावर अक्षता टाकल्या.

मंगलाष्टकें



**अरुण** – गुरुजी, मंगलाष्टकें म्हटलीं त्यांचा अर्थ मला सांगतां का ?

**गुरुजी** – मंगलाष्टकें दोन प्रकारचीं असतात. आशीर्वाद अथवा शुभेच्छा व्यक्त करणारा एक प्रकार; उदाहरणार्थ – " लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा ॥ " हीं क्षीरसागरांतून देव व राक्षस यांनीं घुसळून काढलेलीं रत्नें आणि " गंगासिंधु सरस्वती च यमुना " या भारतांतील पवित्र नद्या यांनीं बटूचें मंगल करावें. दुसरा प्रकार आईनें, वहिनीनें, मावशीनें म्हटलेलीं मंगलाष्टकें.

यांत मुंजा मुलाला बोध केलेला असतो ' आतां तुझी मुंज झाली, तूं अभ्यास कर, दिवसा झोपूं नकोस, अशा प्रकारचा उपदेश यांत असतो. हीं मंगलाष्टकें स्त्रियांनींच म्हणावयाचीं असतात. पुरुषांनीं वेदमंत्र म्हणावयाचे. ठरलेल्या मुहूर्तावर ' तदेव लग्नं सुदिनं तदेव ' म्हणून अंतरपट बाजूला करून, मुंजा मुलाचें तेजस्वी तोंड वडिलांनीं पहावयाचें. मुंजा मुलानें वडिलांना नमस्कार करावयाचा आणि वडिलांच्या मांडीवर बसून ब्राह्मणांकडून मंत्राक्षता घ्यावयाच्या, म्हणजे मुंजीचा एक भाग इथें संपला.

: २ :

मुंजा मुलगा गळ्यामध्यें जानवें घालतो. कमरेला दर्भाची दोरी बांधतो. हरणाचें कातडें गळ्यामध्यें घालतो. अग्नीमध्यें आहुति देतो. हातामध्यें दण्ड घेतो. ' **ॐ भवति भिक्षां देहि** ' म्हणून भिक्षा मागतो. हें तो सर्व कशाकरितां करीत असतो ? असे विचार अरुणच्या मनांत आले. अरुण हा मोठा चौकस मुलगा होता. यासंबंधींची सर्व माहिती त्यानें गुरुजींना विचारली. गुरुजी पण प्रेमळ होते. अरुणच्या प्रश्नांनीं गुरुजींना पण बरें वाटलें; आणि त्यांनीं अरुणला सारें कांहीं समजावून सांगितलें.

**अरुण** – गुरुजी, आम्ही जो होम केला त्या होमाचें नांव काय ?



**गुरुजी** – त्या होमाचें नांव ‘उपनयन-होम’. अग्नि हा सर्व देवतांचें मुख म्हणून मानलें आहे. म्हणून कोणत्याहि देवतेच्या आहुति अग्नींतच अर्पण करतात.

**अरुण** – हा ‘उपनयन-होम’ कशाकरितां करावयाचा असतो ?

**गुरुजी** – हा होम वेदांचें अध्ययन करण्याचा अधिकार मिळावा म्हणून करावयाचा असतो. त्याचा संकल्प ऐकून घे. “**अमुकशर्मणः कुमारस्य द्विजत्वसिद्ध्या वेदाध्ययनाधिकारार्थं उपनयनहोमं करिष्ये।**” म्हणजे – ‘या अमुक नांवाच्या मुलाला द्विजत्व प्राप्त होऊन त्याला वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणून उपनयन होम करतों.’

**अरुण** – गुरुजी, ‘द्विज’ कुणाला म्हणतात हो ?

**गुरुजी** – द्विज म्हणजे दोनदां जन्मणारा. द्वि म्हणजे दोन; जायते म्हणजे जन्मतो. पक्ष्याला देखील द्विज म्हणतात. एकदा अंडें आणि पुन्हां अंड्यांतून पिलूं असे पक्ष्याचे दोन जन्म

होतात. तसेच ब्राह्मणाचेहि दोन जन्म मानले आहेत. एकदा मातेच्या उदरांतून आणि दुसरा उपनयनानंतरचा. मातेच्या उदरांतून जन्माला येतो तेव्हां तो 'शूद्र' च असतो. मुंज होईल तेव्हां तो 'द्विज' होतो. " जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते " असें म्हटलेलें आहे.

### वासोधारणम्

वासोधारणम् म्हणजे वस्त्रें परिधान करणें. ब्रह्मचाऱ्याचा पोशाख कसा असतो पाहा तिहेरी वळलेली कापसाची दोरी कमरेला बांधून लंगोटी घालावी. त्यांवर पांढरा पंचा कमरेभोंवतीं गुंडाळावा, आणि पिवळें वस्त्र बटूला अंगावर पांघरण्याकरितां द्यावें. वस्त्रें देत असतांना हा मंत्र म्हणतात –

**ॐ युवं वस्त्राणि पीवसा वसाथे युवोरच्छिद्रा मतवो ह सर्गाः ।**
**अवातिरतमनृतानि विश्वऽऋतेन मित्रावरुणा सचेथे ॥**

म्हणजे हे मित्रावरुणहो, तुम्ही बळकट वस्त्रें नेसतां. तुम्ही निर्माण केलेलें जग मननीय आहे. तुम्ही जगाला वाईट असणाऱ्या गोष्टींचा नाश करून हें जग वाढवा.

### अजिनधारण

अजिन म्हणजे हरिणाचें कातडें. पूर्वीचे ऋषि हत्या न करतां मेलेल्या हरिणाचें कातडें उपयोगांत आणीत.

**अरुण** – हरिणाचें कातडें कशाकरितां अंगावर घ्यावयाचें ?

**गुरुजी** – तें घेतांना म्हणावयाचा मंत्र आणि त्याचा अर्थ तुला सांगतों म्हणजे तुझ्या प्रश्नाचें उत्तर तुला मिळेल.

**ॐ मित्रस्य चक्षुर्धरुणं बलीयस्तेजो यशस्वी स्थविरं समिद्धम् ।**
**अनाहनस्यं वसनं जरिष्णु परीदंवाज्यजिनं दधस्व ॥**

निर्मळ दृष्टि, स्थिरता, बल, तेज, यश, प्रौढता, निर्वैर, पातकनाश हे गुण या चर्मामध्यें आहेत. सगळें कातडें अंगावर न घेतां जुन्या पैशाएवढा तुकडा दोरीला बांधून जानव्यासारखा गळ्यांत घालतात. ही आपण आपली अलीकडच्या काळांत सोय करून घेतली आहे.

**यज्ञोपवीतधारण**

यज्ञोपवीत म्हणजे जानवें. तें घालतांना पुढील मंत्र म्हणावयाचा असतो –

**ॐ यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात् ।**
**आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ॥**

**अरुण** – अर्थ सांगा गुरुजी या मंत्राचा.

**गुरुजी –** हें ऐक. अत्यंत पवित्र, प्रजापतीबरोबर निर्माण झालेलें, आयुष्य वाढविणारें हें यज्ञोपवीत आमच्या अज्ञानाचा नाश करून आमचें सामर्थ्य आणि तेज वाढवो. समजला अर्थ ? जानवें घातल्यावर पुढें काय केलें सांग पाहूं.

**अरुण –** छातीवर डावा हात ठेवून अग्नीला तुपाच्या आहुति दिल्या. पण, त्या प्रत्येक आहुतीच्या वेळीं ‘ इदं न मम ’ असें कां म्हणावयाचें असतें ?

**गुरुजी –** ‘ इदं न मम ’ म्हणजे या आहुतीवर आतां माझा हक्क राहिला नाहीं; अग्निदेवा, ही तुझीच आहे. असें म्हणून आहुति देत असतांना अग्नीवर आपण केवढी मोठी कामगिरी सोपवितों पहा –

**ॐ अग्न आयूंषि पवसऽआ सुवोर्जमिषं च नः ।**
**आरे बाधस्व दुच्छुनान् स्वाहा ॥**

हे अग्ने, तूं आमच्या आयुष्याचें रक्षण करावेंस. बल व शरीर यांना पुष्ट करणारें अन्न निर्माण करावेंस आणि आमच्यापासून दारिद्र्य, दुष्काळ दूर ठेवावेस.

*अशी प्रार्थना अग्नीला या वेळीं करावयाची असते.*

ॐ अग्निऋषि पवमानः पांचजन्य पुरोहितः ।
तमीमहे महागयं स्वाहा ॥

अशा प्रकारची मागणी लोकांचें कल्याण करणाऱ्या, सर्वसाक्षी, धर्मकृत्याच्या वेळीं स्थापन केलेल्या अग्नीपाशीं आपण करतों.

ॐ अग्ने पवस्वस्वपाऽअस्मे वर्च सूवीर्यम् ।
दधद्रयिं मयि पोषं स्वाहा ॥


— हे चांगलीं सत्कर्में करणाऱ्या अग्ने, तूं मला सामर्थ्यसंपन्न करणारें धन दे.

असे हे तीन मंत्र म्हणून तीन आहुति अग्नीला दिल्या. चौथी आहुति पुढील मंत्र म्हणून प्रजापतीला दिली —

ॐ प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वाजातानि परिता बभूव ।
यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तु वयं स्याम पतयो रयीणां स्वाहा ॥

या मंत्राचा अर्थ असा — हे प्रजापते, या जगताला तुझ्याशिवाय धारण करण्यास कोणीहि समर्थ नाहीं. म्हणून ज्या इच्छेनें आम्ही हवन करूं ती आमची इच्छा तूं पूर्ण कर आणि आम्हांला धनवान् होऊं दे.

## जलावक्षारण



**अरुण** – तुपाच्या आहुति दिल्यावर पूर्वेकडे तोंड करून उभे असलल्या माझ्या वडिलांनीं अग्नीजवळून मला जाण्यास सांगून आपणाकडे तोंड करून जवळ उभें रहाण्यास सांगितलें. मी ओंजळ केली तशी बाबांनीं पण केली. बाबा आपल्या ओंजळींतलें पाणी माझ्या ओंजळींत सोडीत होते. तसाच मी पण बोटांच्या फटींतून पाणी खालीं सोडीत होतों. असा जो प्रकार केला त्याला काय म्हणतात हो गुरुजी ?

**गुरुजी** – त्याला 'जलावक्षारण' म्हणतात. जल म्हणजे पाणी. अवक्षारण म्हणजे सांडणें, झिरपूं देणें. हें जलावक्षारण कुमाराच्या पवित्रतेसाठीं आणि सूर्यदेवतेच्या संतोषासाठीं करतात

**ॐ तत्सवितुर्वृणीमहे वयं देवस्य भोजनम् ।**
**श्रेष्ठं सर्वधातमं तुरं भगस्य धीमहि ॥**

उपासना करण्यास योग्य अशा सूर्यनारायणाची स्तुति करून आम्ही त्याच्यापाशीं उपयुक्त वस्तु देणारें आणि शत्रूंचा नाश करणारें धन मागतों.

**अरुण** – मग बाबांनीं माझा हात अंगठ्यासह धरला आणि मंत्र म्हणून माझें मुंजीतलें नांव ' हे देवदत्तशर्मन् ' असें उच्चारलें.

**गुरुजी** – हो; शिष्यत्व सिद्ध करण्याकरितां तुझा हात तुझ्या वडिलांनीं धरला आणि ते म्हणाले, ' हे देवदत्तशर्मन् ! '

**ॐ सविता ते हस्तमग्रहीत् ।**

म्हणजे सवितारूप मी तुझे हात धरतों.

**ॐ अग्निराचार्यस्तव ।**

अग्निरूप आचार्य तुझा हात घेतों, असें म्हणून तुला कुठें नेलें सांग बघूं ?

**अरुण** – मांडवाबाहेर मला आणलें व मला सूर्य दाखविला.

सूर्यदर्शन

**गुरुजी** – बरोबर.

**ॐ देवसवितरेष ते ब्रह्मचारी तं गोपाय समामृत ।**



'हे तेजस्वी सूर्यनारायणा, हा ब्रह्मचारी तुला रक्षण करण्यास योग्य आहे. तूं त्याचें रक्षण कर. त्याला मरण न येवो.' असें म्हणून तुझ्या वडिलांनीं तुला रक्षणाकरितां सूर्याच्या स्वाधीन केलें. तुझें रक्षण व्हावयाचें तें सूर्याकडून; पण तुझ्यावर सत्ता मात्र प्रजापतीची.

**कस्य ब्रह्मचार्यसि प्राणस्य ब्रह्मचार्यसि ।**
**कस्त्वा कमुपनयते काय त्वा परिददामि ।**

म्हणजे 'हे कुमारा, तूं वायु व प्रजापतीचा ब्रह्मचारी आहेस. प्रजापति तुला आपणाजवळ घेत असून मी तुला अर्पण करीत आहें.' असें म्हणून तुझ्या वडिलांनीं तुला प्रजापतीला अर्पण केलें; आणि म्हटलें –

**ॐ युवा सुवासाः परिवीत आगात स उ श्रेयान् भवति जायमानः ।**

हा सुंदर वस्त्रें धारण केलेला, कृष्णाजिन म्हणजे हरिणाचे कपडे पांघरलेला हा तरुण ब्रह्मचर्याश्रमांत गेला.'

**ॐ तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो मनसा देवयन्तः।**

हा मुंजीनंतरच्या ज्ञानप्रधान ब्राह्मणजन्मांत जाणारा विद्या वगैरे शिकून चांगला होवो आणि अशा कुमाराला तपस्वी व योगी लोक उत्कर्षाला नेवोत.

**अरुण** – हो, हो. "ॐ तं धीरासः" हा मंत्र म्हणत असतांनाच बाबांनीं माझ्या छातीवर हात ठेवून अग्नि व आपल्यामधून मला नेलें; आणि अग्नीपाशीं पूर्वेकडे तोंड करून मला बसविलें.

त्या वेळीं तुम्ही म्हणालांत – 'आतां अग्निकार्य करावयाचें.'

अग्निकार्य

**अरुण** – गुरुजी, अग्निकार्यांतील आहुतींच्या मंत्रांचा अर्थ मला समजावून सांगतां का?

**गुरुजी** – हो, नीट लक्ष देऊन ऐक.

**ॐ अग्नये समिधमाहार्षं बृहते जातवेदसे।**
**तया त्वमग्ने वर्धस्व समिधा ब्रह्मणा वयं स्वाहा॥**

हा समिधा अर्पण करण्याचा मंत्र. 'हे अग्ने, तूं समिधांनीं प्रज्वलित हो आणि आमचा उत्कर्ष कर' हा त्या मंत्राचा सारांश आहे.

**अरुण** – समजलें आणि गुरुजी त्याच वेळीं मी हात धुतला, अग्नीवर जरा तापवला आणि तोंडावरून फिरविला. असें मीं दोनदां केलें.

**गुरुजी** – त्या वेळीं मीं तुला काय म्हणायला सांगितलें, आठवतें ?

**अरुण** – हो ‘ **तेजसा मा समनज्मि ।** ’ असें म्हणायला सांगितलेंत.

**गुरुजी** – हां, त्याचा अर्थ असा – ‘हे अग्निनारायणा, तुझें तेज माझ्यामध्यें येवो. ’ अशी ही अग्नीची प्रार्थना करावयाची असते. शिवाय अग्नि-उपस्थानाचे हे मंत्र पहा –

**ॐ मयि मेधां मयि प्रजां मय्यग्निस्तेजो दधातु ।**
**मयि मेधां मयि प्रजां मयींद्र इंद्रियं दधातु ।**
**मयि मेधां मयि प्रजां मयि सूर्यो भ्राजो दधातु ।**
**यत्ते अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासम् ।**
**यत्ते अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वी भूयासम् ।**
**यत्ते अग्ने हरस्तेनाहं हरस्वी भूयासम् ॥**

अग्नि मला बुद्धि, प्रज्ञा आणि तेज देवो. इद्र इंद्रियें देवो. सूर्य मला इंद्रियें आणि तेज देवो. हे अग्ने, तुझ्या तेजानें मी तेजस्वी होईन. तुझ्या सत्तेनें मी अधिकारी होईन आणि तुझ्या कांतीनें मी कांतिमान् होईन.

**अरुण** – त्याच वेळीं मी भस्म अंगाला लावलें. हें भस्म कशाकरितां अंगाला लावावयाचें ?

**गुरुजी** – भस्म अंगाला लावण्यानें आयुष्य वाढतें. भस्म अंगाला लावणारा रुद्र त्याची या मंत्रानें प्रार्थना करावयाची असते –

**ॐ मा न स्तोके तनये मा न आयौ मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः ।**
**वीरान् मा नो रुद्र भामितो वधीर्हविष्मन्तः स दमित्वा हवामहे ॥**

यांत संहारक देव रुद्राला विनवीत आहे कीं, हे रुद्रा, आमचा मुलगा, नातू वगैरे नातेवाईक माणसें, गाई, घोडे यांना तूं मारूं नकोस. आमच्या शूर लोकांना रागावून ठार करूं नकोस. आम्ही यज्ञांत तुला आहुति देऊन नेहमीं संतुष्ट करूं.

ही प्रार्थना केल्यावर –

**त्र्यायुषं जमदग्नेरिति ललाटे । कश्यपस्य त्र्यायुषमिति कण्ठे ।**
**अगस्त्यस्य त्र्यायुषमिति नाभौ । यद्देवानां त्र्यायुषमिति दक्षिणस्कंधे ।**
**सर्वमस्तु शतायुषं शिरसि ।**

त्र्यायुषं म्हणजे तीनदां जमदग्नीचा अपमृत्यु टाळणारें भस्म मी कपाळाच्या ठिकाणीं लावतों. त्याचप्रमाणें कश्यपाचा तीनदां अपमृत्यु टाळणारें भस्म मी गळ्याला लावतों. शेवटीं मला शंभर वर्षें आयुष्य दे, असें म्हणून मस्तकाला लावावें.

<u>अग्निप्रार्थना</u>

**ॐ च मे स्वरश्च मे यज्ञोप च ते नमश्च ।**
**यत्ते न्यूनं तस्मै त उपयत्तेऽतिरिक्त तस्मै ते नमः ।**
**अग्नये नमः । ॐ स्वस्ति ॥**
**श्रद्धां मेधां यशः प्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलम् ।**
**आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ।**

हे अग्ने, वेदांतील मुख्य ॐ व सर्व वर्णांतील स्वर तूंच आहेस. यज्ञ पूर्ण करणाऱ्या तुला नमस्कार असो. अधिक-उणें कांहीं झालें असेल त्याकरितां तुला मी नमस्कार करतों.


तूं मला श्रद्धा, मेधा, यश, प्रज्ञा, विद्या, बुद्धि, संपत्ति, बळ, आयुष्य, तेज, आरोग्य दे.

**अरुण** – यानंतर मी माझ्या वडिलांसमोर गेलों. उजवा गुडघा जमिनीवर टेकवून दोन्ही हातांनीं कानांस स्पर्श करून मीं वडिलांचे पाय धरले.

**गुरुजी** – हो, असें करण्यांत नम्रता दिसून येते. वडिलांच्या पायांना हात लावून तूं म्हणालास, " वासिष्ठगोत्रोत्पन्नः देवदत्तशर्मा अहं भो अभिवादये । " म्हणजे वासिष्ठ गोत्रांत उत्पन्न झालेला देवदत्त नांवाचा मी नमस्कार करतों. त्यावर तुझे वडील तुला म्हणाले, " आयुष्मान् भव ! "

**अरुण** – त्यावर मी पुन: म्हणालों, " अधीहि भो सावित्रीं भो अनुब्रूहि । "

**गुरुजी** – हो. त्याचा अर्थ – हे गुरो, अगोदर आपण गायत्रीमंत्र म्हणा व नंतर मला सांगा.



**अरुण** – मग तुम्ही मला डावा हात उताणा व त्यावर उजवा हात पालथा, असे दोन्ही हात जोडायला लावून, दोन्ही हातांचीं बोटें घट्ट दाबून धरून ते हात उजव्या मांडीवर ठेवावयास लावलेत. मग बाबांनीं माझ्या अंगावरील पंचानें माझे हात झांकले. आपल्या दोन्ही हातांनीं माझे हात धरून मला मंत्र शिकंविला.

**गुरुजी** – तुझ्या हातांची ती मी तुला ब्रह्मांजलि करण्यारा सांगितलें. बाबांनीं जो तुला मंत्र शिकविला तो छंदऋषींसह म्हणून दाखव पाहूं.

**अरुण** – पण छंदऋषि म्हणजे काय हें कुठें मला माहीत आहे ?

**गुरुजी** – प्रत्येक मंत्राला देवता, ऋषि आणि छंद असतो. देवता, छंद, ऋषि यांचा मंत्रापूर्वी उच्चार केलाच पाहिजे, नाहीं तर मंत्राचें फळ मिळत नाहीं. हां म्हण –

**गायत्रीमंत्र**


**अरुण** – म्हणतों गुरुजी. चुकला तर मात्र सांगा हं.

**प्रणवस्य परब्रह्म ऋषिः । परमात्मा देवता । दैवी गायत्री छंदः ।**
**सप्तानां व्याहृतीनां परमेष्ठी प्रजापतिः प्रजापतिर्बृहती ।**
**गायत्र्या विश्वामित्र सविता गायत्री ॥**

**गुरुजी** – थांब, ऐक. या गायत्री मंत्राचा विश्वामित्र ऋषि, सविता ही देवता आणि छंद म्हणजे वृत्त गायत्री आहे. समजलें आतां छंद, ऋषि म्हणजे काय तें. आतां पुढें म्हण –

**अरुण** – ॐ भूर्भुवः स्वः ।

**ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ।**



याचा अर्थ सांगा आतां.

**गुरुजी** – ऐक तर. बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या श्रेष्ठ व पापनाशक तेजाचें आम्हीं ध्यान करतों.

<u>दीक्षाप्रदान</u>

**अरुण** – गुरुजी, माझ्या छातीवर बाबांनीं हात ठेवून मला काय सांगितलें हो ?

**गुरुजी** – त्याला दीक्षाप्रदान म्हणतात. म्हणजे आपलीं व्रतें, आचारविचार आपल्या शिष्याला देणें. बघ, मंत्रांत काय सांगितलें आहे तें –

**ॐ मम व्रते हृदयं ते ददामि मम चित्तमनुचित्तं ते अस्तु ।**
**मम वाचमेकव्रतो जुषस्व बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम् ॥**

'हे शिष्या, माझे नियम पाळण्याकडे तुझें लक्ष असो. माझ्या मनाशीं तुझें मन जुळो. माझ्या आज्ञा एकनिष्ठेनें पाळीत जा. बृहस्पति तुझी योजना माझ्याकडे करो.' – असें तुझ्या वडिलांनीं तुला तुझ्या छातीवर हात ठेवून सांगितलें.

## मेखलाबंधन

मेखलाबंधन म्हणजे दर्भांची दोरी. या दोरीचे तीन वेढे कमरेभोंवतीं द्यावयाचे असतात. हें मेखलाबंधन ब्रह्मचाऱ्याच्या रक्षणासाठीं करतात. ब्रह्मचाऱ्यानें आपण तीनहि वेदांनीं वेष्टित झालों आहें अशी मेखलाबंधनानंतर भावना करावयाची असते.

**ॐ इयं दुरुक्तापरिबाधमानाच्छर्म वरूथं पुनती न आगात् ।**
**प्राणापानाभ्यां बलमाभरन्ती प्रिया देवानां सुभगा मेखलेयम् ।**
**ऋतस्य गोप्त्री तपसः परस्पी व्रती रक्षः सहमाना अरातीः ।**
**सा नः समंतमनु परीहि भद्रया भर्तारस्ते मेखले मा रिषाम ॥**

या मंत्रांचा अर्थ हा आहे –


अशुभाचा नाश करणारी, गृहाला शोभा देणारी अशी ही मौंजी म्हणजे मेखला आम्हांला मिळो. प्राण आणि अपान यांच्या द्वारा सामर्थ्य वाढविणारी अशी मेखला सौभाग्यकारक होवो.

सत्य व तप यांचें संरक्षण करणारी, राक्षसांना मारणारी व शत्रूंचा पराभव करणारी मेखला आम्हांला मिळो. हे मंगल व रक्षक मेखले, तुला आम्ही आमच्या कमरेला बांधलें असतां आम्हांला कधींहि पीडा न होवो.

दण्डधारण

**ॐ स्वस्ति नो मिमीतामश्विना भगः स्वस्ति देव्यदितिरनर्वणः ।**
**स्वस्ति पूषा असुरो दधातु नः स्वस्ति द्यावापृथिवी सुचेतुना ॥**

अश्विदेव आमचें कल्याण करोत. तसेंच भग, देवी आदिति, बल देणारा पूषादेव आमचें कल्याण करोत. तसेंच स्वर्ग-पृथ्वीहि आमचें कल्याण करोत.



हा मंत्र म्हणून आम्ही तुझ्या हातांत दण्ड दिला.

**अरुण** – दण्ड दिल्यावर माझ्याकडून काय म्हणवून घेतलेंत ?

**गुरुजी** –

**अदान्तं दमयित्वा मां मार्गे संस्थापयन् स्वयम् ।**
**दण्ड करे स्थितो यस्मात्तस्माद्रक्ष यतो भयम् ।**


म्हणजे ' उद्धट असलेल्या मला नम्र करून सन्मार्गाला लावणारा हा दंड मी हातांत धरला आहे. हे दंडा, जिकडून मला भय असेल तिकडून माझें रक्षण कर. '

दंड हातांत कां घेतात हें तुला आतां समजलें. आता तूं ब्रह्मचर्याश्रमांत प्रवेश केला आहेस. आपल्या धर्मांत चार आश्रम सांगितले आहेत. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास. त्यांपैकीं पहिल्या आश्रमांत तूं आतां प्रवेश केल्यावर त्या आश्रमाचे नियम तुला समजावून सांगावयाचे आहेत.

: ३ :

उपदेश

मुंज झाल्यावर वागावें कसें हें समजलें पाहिजे. ब्रह्मचर्याश्रम हा पवित्र आश्रम आहे. म्हणून ब्रह्मचाऱ्यानें निर्मळपणानें राहिलें पाहिजे. मुंजीच्यां दोन-चार दिवसांत तेवढी संध्या केली, अग्निकार्य केलें म्हणजे झालें; मग त्याचा कांहीं संबंध नाहीं असें पुष्कळ मुलांना वाटतें. पण ब्रह्मचाऱ्याला उपदेश सांगितला आहे तो ऐक आणि त्याच्यांत किती मोठा अर्थ भरलेला आहे तो पहा. असें म्हणून गुरुजी अरुणाला उपदेशाचें एक एक सूत्र सांगूं लागले.



## १. ब्रह्मचार्यसि

तुझें बालपण संपून तूं ब्रह्मचर्य आश्रमांत आतां प्रवेश केला आहेस. म्हणून ब्रह्मचाऱ्याच्या नियमांप्रमाणें तुला वागलें पाहिजे.

## २. अपोशान

लघवीला गेल्यावर स्वच्छ हातपाय धुवावेत. तसेंच जेवण झाल्यावरहि स्वच्छ तोंड-हात धुवावेत. घाणेरडेपणानें वागूं नये. कपडे नीटनेटके ठेवावेत व ते स्वच्छ असावेत.

## ३. कर्म कुरु

प्रातःस्मरण, स्नानसंध्या, पूजा, उपासना करावी. संध्येनें मन पवित्र होतें. प्राणायामानें हृदय व फुप्फुसें बळकट होतात. सूर्यनमस्कारांनीं सर्व शरीरास व्यायाम होऊन शरीर सुदृढ होतें. श्रद्धेनें ज्ञानांत भर पडते. आणि उपासनेनें धैर्य प्राप्त होतें.

## ४. दिवा मा स्वाप्सीः ।

दिवसा झोंप घेऊं नये. दिवसा झोंप घेतल्यानें मेंदूचा तरतरीतपणा रहात नाहीं. त्यामुळें अध्ययन होत नाहीं. रात्रीचेंहि जागरण करूं नये. लवकर झोंपावें व लवकर उठावें. आपल्याकडे एक म्हण आहे, ' लवकर निजे, लवकर उठे तया ज्ञानसंपत्तिआरोग्य भेटे. '

विभाग
क्रमांक

**५. आचार्याधीनो वेदमधीष्व।**

आचार्य म्हणजे गुरुजी. गुरुजींच्या आज्ञेंत राहून ज्ञान संपादन कर. गुरुजींवर श्रद्धा ठेव. आईवडिलांप्रमाणेंच गुरुजी हे पण देवच आहेत. त्यांच्या कृपेनें सर्व प्रकारचें ज्ञान मिळवितां येतें.

**६. सायंप्रातर्भिक्षेथाः।**

सकाळ-संध्याकाळ भिक्षा ( माधुकरी ) मागत जा. पूर्वींच्या लोकांनीं विद्यार्थ्यांकरितां माधुकरीची सोय केली होती. विद्यार्थ्याला अभ्यास करीत असतांना अन्नाची विवंचना नको. अर्धा-पाऊणतास हिंडून माधुकरी मागितली म्हणजे जेवणाचें काम भागलें. राहिलेला सगळा वेळ अभ्यासाकरितां मिळतो. कांहीं मोठमोठ्या लोकांनीं माधुकरी मागून अभ्यास केला आहे.

**७. सायंप्रातः समिधमाधेहि।**

सकाळीं आणि संध्याकाळीं अग्निपूजा करून अग्नीला समिधा देत जा. अग्नीच्या कृपेनें ब्रह्मचारी अग्नीप्रमाणेंच तेजस्वी होतो.

**८. द्वादशवर्षाणि वेदग्रहणान्तं वा ब्रह्मचर्यं चर।**

बारा वर्षें अथवा अध्ययन संपेपर्यंत ब्रह्मचर्यव्रतानें रहा.

**९. अप्रत्याख्यायिनमग्रे भिक्षेथाः। अप्रत्याख्यायिनीं वा।**

जो पुरुष अथवा जी स्त्री तुझा अपमान न करतां आदरानें कांहीं ना कांहीं वाढल्या-शिवाय परत जाऊं देणार नाहीं अशाच माणसांकडे भिक्षा मागण्यास जा.

गुरुजी पुढें सांगूं लागले –

हा मुंजींतला उपदेश झाला. पूर्वीं गुरुकुलें असावयाचीं. त्या ठिकाणीं विद्यार्थी जात असत. सुदैवानें वडिलांनींच चालविलेलें गुरुकुल ज्याला लाभे तो मुलगा वडिलांच्या सान्निध्यांत असे. ज्याच्या वडिलांचें गुरुकुल नव्हतें त्या मुलाला अन्य ठिकाणीं शिक्षणाकरितां पाठवीत. बारा-बारा वर्षें आईवडिलांची भेट होत नसे. पण गुरुकुलांचे कुलपति वडिलांप्रमाणेंच सर्व विद्यार्थ्यांवर प्रेम करीत; त्यांची सर्व प्रकारें काळजी वहात.

मुंज हा एक संस्कार आहे. संस्कारानें मन आणि शरीर सुदृढ बनतें. हिरा खाणींत असतो, तेव्हां तो एक दगडच असतो. तो घासून-पुसून, पैलू पाडून संस्कार केले म्हणजे तो खरा हिरा होतो; आणि तेव्हांच त्याला किंमत येते. त्याचप्रमाणें चांदी, सोनें, तांबें, पितळ हे पदार्थ भूमींत असतांना माती-दगडांच्याच स्वरूपांत असतात. पण ते तापवून, गाळून, घासून त्यांवर

करावयाचे संस्कार केले म्हणजे ते जगाच्या बाजारपेठेंत येतात आणि मग त्यांना आपण चांदी, सोनें, पितळ, तांबें म्हणून ओळखतों व त्यांची योग्य ती किंमत देतों.

मानव पण संस्कार करण्याला योग्य असा आहे. बालपणांत लाडानें निरनिराळ्या संवयी जडलेल्या असतात त्यां विद्येला मारक असतात. त्या विद्येला प्रारंभ करतांना काढून टाकल्या पाहिजेत. शेतकरी जसा शेतांत प्रथम जमीन भाजून, नांगरून पिकाला मारक असणारीं इतर रोपें आणि वनस्पति बीजासकट काढून टाकून मगच पेरावयाचें तें पेरतो, त्याप्रमाणेंच मुंजीच्या संस्कारानें कुमाराच्या अंगांत असणारे आळस, अज्ञान, इत्यादि दुर्गुण नाहींसे होतात आणि विद्येचें बीज पेरण्यास कुमाराची बुद्धि योग्य होते; म्हणूनच महाविद्येच्या प्रारंभासाठीं उपनयन किंवा मुंज हा संस्कार आपल्या धर्मांत सांगितला आहे.

बहुतेक लोकांचा तुझ्याचप्रमाणें या मुंजीच्या संस्कारासंबंधीं गैरसमज झालेला असतो. त्यांच्या मतें थोडक्यांत मुंज म्हणजे नातेवाईक व इष्टमित्रांचें स्नेहसंमेलनच असतें. असें त्याला आतां स्वरूप आलें आहे हें खरें; पण त्याचा मूळ उद्देश जाणत्यांनीं समजून घेतला पाहिजे. असो; जेवणाची वेळ होत आली. मुंजींतला एक महत्त्वाचा विधि 'मेधाजनन' हा आमच्या सोयीप्रमाणें आत्तांच करून घ्यायचा आहे.

## मेधाजनन

**अरुण** – मेधाजनन म्हणजे काय आणि तो प्रयोग कशाकरितां करतात ?

**गुरुजी** – मेधा म्हणजे बुद्धि, प्रज्ञा. ती या प्रयोगानें निर्माण होते. मेधा हिचें दुसरें नांव सावित्री हिचें पूजन यांत आहे. याच मेधाजननाला 'पळसुला' असें म्हणतात. पळसाची फांदी ठेवून तिचें या कृत्यांत पूजन करतात यानें उपनयन-व्रताची सांगता होऊन कुमाराच्या ठिकाणीं वेद धारण करण्याची समर्थ बुद्धि निर्माण होते.

अरुणनें गुरुजींनीं सांगितल्याप्रमाणें पळसाच्या फांदीचें पूजन केलें. गुरुजींनीं त्याला शेवटीं मेधासूक्त म्हणण्यास सांगितलें. तें मेधासूक्त असें होतें –

**ॐ मेधां मह्यमंगिरसो मेधां सप्तर्षयो ददुः ।**
**मेधामिंद्रश्चाग्निश्च मेधा धाता ददातु मे ॥**

सप्तऋषी, इंद्र, अंगिरस ऋषि, अग्नि आणि ब्रह्मदेव हे सर्व कधीं विस्मृति न होईल अशी मेधा मला देवोत.

**मेधां मे वरुणो राजा मेधां देवी सरस्वती ।**
**मेधां मे अश्विनौ देवा धत्तां पुष्करस्रजा ॥**

वरुण राजा, सरस्वती देवी व कमलांच्या मालां धारण करणारे अश्विनीकुमार मला मेधा देवोत.

**या मेधा अप्सरस्सु गंधर्वेषु च यन्मनः ।**
**दैवी या मानुषी मेधा सा मामा विशतादिमाम् ॥**

अप्सरांमध्यें व गंधर्वांमध्यें मनोरूपानें जी मेधा रहाते, जी देवांत आणि मनुष्यांत असते, ती मेधा माझ्या बुद्धींत येवो.

**यन्मे नोक्तं तद्रमेतां शकेयं यदेनुब्रुवे । निशाम तन्निशामहै मयि व्रतं सह व्रतेषु ॥**

मी जरी पठण केलें नसेल अथवा वारंवार करीत नसेन, तरी हा वेद माझ्या अंतः-करणांत स्थिर राहो. माझें वेदाचें ज्ञान कोणाहि वेदज्ञाशीं बरोबरी करणारें असो.

**अवृद्धमहमसौ सूर्यो ब्रह्मणानीस्थः श्रुतं मे मा प्रहासीः ।**
**मेधां देवीं मनसा रेजमानां गंधर्वजुष्टां प्रति नो जुषस्व ॥**

माझें शरीर तरतरीत असो. मनाला मोह पाडणाऱ्या गोष्टींचा द्रोह करणारी माझी वाणी, सदोदित उत्साही असणाऱ्या मला हा सूर्य, ज्ञानावर माझी आसक्ति जडवून एकदां कानावर पडलेलें कधींहि न विसरेल असें करोत.

**मह्यं मेधां वद मह्यं श्रियं वद मेधावी भूयासमजराजरिष्णु ।**

मला बुद्धि व कांति असो, असें तूं म्हण. दिवसेंदिवस क्षीण होणारें हें शरीर म्हातारपणानें युक्त न होतां मला बुद्धिमान् कर.

**यां मेधां देवगणाः पितरश्चोपासते । तया मा मेधया मे मेधाविनं कुरु ॥**

ज्या मेधा देवीची देवगण व पितर उपासना करतात, त्या मेधा देवीच्या योगानें मला हे ब्रह्मवृक्षा, तूं बुद्धिमान् कर.

**मेधाव्यहं सुमनाः सुप्रतीकः श्रद्धामनाः सत्यमतिः सुशेवः ।**
**महायशा धारयिष्णुः प्रवक्ता भूयासमस्ये स्वधया प्रयोगे ॥**

चांगले विचार बाळगणारा, सुदृढ हातपाय वगैरे अवयवं असलेला, श्रद्धावान्, एकनिष्ठ, सुस्वरूप, मोठा कीर्तिमान्, धैर्यसंपन्न व प्रवचन करणारा असा बुद्धिमान् मी होईन; आणि कोणत्याहि विद्येच्या चर्चेच्या वेळीं मी माझ्या बुद्धीचा प्रभाव दाखवीन.

गुरुजींनीं मंत्रांबरोबरच त्यांचा अर्थहि सांगितला. अरुणला मेधासूक्त फार आवडलें. तो गुरुजींना म्हणाला, " गुरुजी, मी हें सूक्त रोज म्हणेन. "

नंतर जेवणाची तयारी झाली. पानें ठेवून रांगोळ्या काढल्या. जेवणाच्या पंक्ती उठल्या.

## अनुप्रवचनीय होम

संध्याकाळीं सायंसंध्या व अनुप्रवचनीय होमाकरिता गुरुजी आले. सायंसंध्या गुरुजींनीं अरुणला शिकविली आणि उपनयनांतीलच एक भाग जो अनुप्रवचनीय होम तोहि केला. अरुणनें त्या होमाच्या वेळीं म्हटलें –

**ॐ सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यं । सनिं मेधामयासिषं स्वाहा ॥**

यज्ञपति, तेजस्वी, इंद्रप्रिय अशा अग्नीपाशीं आम्ही धन आणि सूक्ष्म बुद्धि मागतों.

या मंत्रानें त्यानें आहुति दिली. होम झाल्यावर अरुण गुरुजीपाशीं येऊन बसला. त्याच्या मनांत आणखी कांहीं शंका होत्या. तो म्हणाला, " गुरुजी, मुंजींत आणखी नांव कशाकरितां व कसें ठेवतात ? "

**गुरुजी** – मी तुला मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, द्विज म्हणजे दोनदां जन्माला येणारे. उपनयन हा दुसरा जन्म मानला, तर त्या जन्मांतील दुसरें नांव पाहिजेच. मात्र पूर्वीच्या जन्माचा यांत संबंध तुटला असा त्याचा अर्थ नव्हे. तुझें जन्मनक्षत्र रेवती. रेवतीच्या पहिल्या चरणावर तुझा जन्म झाला. रेवती नक्षत्राच्या पहिल्या चरणाचें अक्षर 'दे' म्हणून आम्ही तुझें मुंजींतलें नांव 'दे' अक्षरानें सुरुवात होणारें 'देवदत्त' असें ठेवलें. समजलें ?

**अरुण** – गुरुजी, इतर धर्मांत मुंजीचा संस्कार नाहीं का ?

**गुरुजी** – इतर धर्मांत मुंज हें त्याचें नांव नसेल, पण या हेतूनें दुसरा संस्कार असतो. मुसलमानांत 'सुंता' म्हणून संस्कार आहे. तो बहुतेक मुंजीसारखाच आहे. बौद्ध पंथांत 'प्रव्रज्या' व 'उपसंवदा' असे जे संस्कार आहेत ते मुंजीसारखेच आहेत. प्रव्रज्या म्हणजे गुरुगृहीं जाणें आणि उपसंवदा म्हणजे अध्ययन पुरें करणें. प्रव्रज्येच्या वेळीं अशीच श्मश्रू करून पिवळें वस्त्र देतात. पारश्यांत 'नवज्योत' म्हणून जो संस्कार वयाच्या सातव्या वर्षी करतात तो अगदीं मुंजीसारखाच आहे. तथापि, या बाबतींत आपल्याइतका शास्त्रशुद्ध व परिपूर्ण विचार इतरत्र केलेला दिसत नाहीं.

**अरुण** – सोडमुंज म्हणजे काय हो ?

**गुरुजी** – सोडमुंज म्हणजे अध्ययन संपल्यानंतर गुरूच्या आज्ञेनें ब्रह्मचर्यव्रत संपवून गुरूपासून लग्न करण्याची आज्ञा मिळवून स्वतःच्या घरीं यावयाचें आणि मग ब्रह्मचर्यव्रताची सांगता म्हणजे समावर्तन करावयाचें. त्यालाच म्हणतात सोडमुंज.

卐 卐 卐

# मंगलाष्टकें

यं ब्रह्मावरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवैः ।
वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायंति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनो ।
यस्यान्तं न विदुः सुराः सुरगणा देवाय तस्मै नमः ॥ १ ॥

लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुराधन्वंतरिश्चंद्रमा ।
गावः कामदुधाः सुरेश्वरगजो रंभादिदेवांगनाः ॥
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चांबुधेः ।
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्यात् बटोर्मंगलम् ॥ २ ॥

गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा ।
कावेरी शरयु महेंद्रतनया चर्मण्वती वेदिका ॥

क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता च या गंडकी ।
पूर्णा पूर्णजलैः समुद्रसहिता कुर्वन्तु वो मंगलम् ॥ ३ ॥

आहे मुंज तुझी म्हणूनि जमलों आम्ही तुझे सोयरे ।
सांगूं जें तुजला अशा समयिं तें ध्यानीं धरी नित्य रे ॥
मातापितृ गुरू तयांस नमुनी देवांसवें मानणें ।
श्रद्धेनें भजतां नसे मग तुझ्या भाग्यासि किंचित् उणें ॥ ४ ॥

नेमानें करि तूं तुला शिकविलें जें कर्म संध्यादिक ।
निष्ठेनें उपमन्यु पैल शिकले विद्या तशी तूं शिक ॥
व्यायामें करि धष्टपुष्ट शरिरा हो धैर्यशाली असा ।
श्रीकृष्ण प्रभुरामचंद्र शिवबा राणा प्रतापें जसा ॥ ५ ॥

卐

# या पुस्तकासंबंधीं मला काय वाटतें –

आपण जरा निसर्गाकडे दृष्टि टाका, प्रत्येक पदार्थ आपल्यासाठीं संस्काराची अपेक्षा करीत असलेला आपणांस दिसेल. साधा दगड सुद्धां, इष्ट ते संस्कार जर त्याच्यावर न होतील तर त्याचा उपयोग करून घेतां येत नाहीं. अशा रीतीनें या विश्वब्रह्माण्डांतील पदार्थजात हें संस्कारांचीच अपेक्षा करीत असलेलें आपणांस आढळून येईल.

जड पदार्थांच्या बाबतींत जर संस्कार हे आवश्यक असल्याचें आपण मानतों तर सजीव सृष्टीच्या बाबतींत त्यांची आवश्यकता किती तरी पटीनें अधिक आहे हें मुद्दाम पटविण्याची वास्तविक गरज असूं नये.

परंतु काय असेल तें असो, भौतिक वातावरणाच्या अनैसर्गिक प्रभावामुळें आज मानवी जीवनांत अत्यंत आवश्यक असणाऱ्या संस्कारांकडे दुर्लक्ष होत चाललेलें आहे, ही गोष्ट मात्र खरी. याचा परिणाम आपल्या समाजधारणेवर होऊन तद्द्वारां राष्ट्रीय एकात्मतेवर होतो आहे. आणि ज्याची आज आपण सामाजिक किंवा राष्ट्रीय जीवनांत अपेक्षा करतों आहोंत, ती मानवता मात्र दिवसेंदिवस दिसेनाशी होऊन त्याऐवजीं अगदीं प्राथमिक स्वरूपाचीं वैकारिक अगर पाशवी मूल्यें ठायीं ठायीं प्रकर्षानें आढळूं लागलीं आहेत.

भारतीय समाजशास्त्रज्ञांनीं या दृष्टीनें अत्यंत सखोल आणि व्यापक विचार करून अत्यावश्यक असे कमींत कमी बेचाळीस संस्कार मानवी जीवनाच्या इहपर उत्क्रांतीसाठीं सांगितले आहेत. आज या बेचाळीस संस्कारांचीं क्रमशः नांवें सुद्धां किती जणांना ठाऊक असतील हा प्रश्नच आहे !

बेचाळीस संस्कार गेले, त्यानंतर षोडश संस्कारहि गेले व आज जेमतेम फक्त दोनच संस्कार कसेबसे शिल्लक राहिले आहेत. तेहि हळूहळू जाण्याच्याच पंथास लागले आहेत. हे दोन संस्कार म्हणजे **'उपनयन'** आणि **'विवाह'** हे होत.

या दोन संस्कारांपैकीं 'उपनयन' संस्कार हा सर्व संस्कारांत पायाभूत असा महत्त्वाचा संस्कार आहे. पण आज या संस्काराचें महत्त्व वैज्ञानिक दृष्टीनें सुद्धां किती मोठें आहे हें लोकांना माहीत नाहीं.

जीवनांतील सर्वांत महत्त्वाचें पर्व म्हणजे हें संचयपर्व होय. यालाच ब्रह्मचर्याश्रम असें म्हणतात. व्यक्तीच्या भूमिकेवरून आश्रम-व्यवस्था व्यक्तीच्या सर्वविध उत्क्रांतीसाठीं म्हणून भारतीय ऋषींनीं सांगितली व समाजाच्या भूमिकेवरून वर्णव्यवस्था सांगितली. जिथें व्यक्तीचाच विकास नाहीं तिथें समाजाचा तरी कसा व्हावा ?

अनुक्रम ३२५१९
विभाग
क्रमांक

शक्तिसञ्चयासाठीं संयमाची दीक्षा या उपनयन संस्कारांत बटूला मिळते. संयतजीवन हें स्वैर जीवनापेक्षां अधिक श्रेयस्कर व आदर्श असतें हें आजवर जे जे युगन्धर महापुरुष भारतांत अवतीर्ण झाले त्यांच्यावरून आपल्या लक्षांत येईल. **कामवाद, कामचार, कामभक्ष** यांचा निषेध भारतीय ऋषींनीं सदैव केलेला आहे. आहारावर, मनावर, विचारांवर, आचारांवर सर्वथैव या सञ्चयपर्वांत जें नियंत्रण घातलें जातें त्या नियंत्रणांतूनच पुढें त्या संयतजीवनांतून लोक-कल्याणार्थ विश्वव्यापक शक्तिस्रोत सुरू होतो हें कौत्स व तत्सम इतर अनेक स्नातक आणि त्या-नंतरच्या ज्ञानेश्वरप्रभृति यांच्या जीवनाकडे पाहिलें तर सहज कळून येईल. आद्य शंकराचार्य घ्या किंवा सुपरिचित असे श्रीपाद श्रीवल्लभ किंवा त्यांचेच उत्तरावतार श्रीनृसिंहसरस्वती घ्या, केवढें लोकोत्तर कार्य त्यांनीं केलें ? कशाच्या जोरावर – तर संयतजीवनाच्या जोरावर. आजच्या स्नातकांकडे पहा, कोणतीहि उपासना नाहीं; वाटेल तें आणि वाटेल तिथें खावें, प्यावें, बोलावें. याचा परिणाम – त्यांच्या वाणीची, मनाची व तद्द्वारां सकलेंद्रियांची किती शक्ति ऱ्हास पावत आहे ! याचा विचार गंभीरपणानें करण्याची वेळ आतां तरी निश्चित आली आहे. आत्मप्रत्ययशून्य अशा आजच्या विद्यार्थ्यांच्या जीवनांत कितीहि ज्ञान कोंबलें तरी त्या ज्ञानाची म्हणून स्वतंत्र अशी शक्ति त्यांच्यांत कशी निर्माण होणार ? व व्हावी ?

सद्गुणांबद्दल खरी आवडच निर्माण जिथें होत नाहीं किंवा केली जात नाहीं तिथें केवळ सद्गुणांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन काय फायदा ?

उपनयन संस्कारानें स्मृति, मेधा, प्रज्ञा तीव्र होते व तीव्र प्रज्ञेनें त्यांच्या शक्तीचा बराच ऱ्हास थांबतो. अग्निकार्य, संध्या, ब्रह्मयज्ञ, मेखलाबंधन आणि दंड हीं केवळ बटूचींच आभूषणें आहेत असें नव्हे, तर तीं राष्ट्राचींहि अक्षय्य अशीं बहुमोल आभूषणें आहेत. उपनयन संस्कार म्हणजे पाशवी मूल्यांतून आध्यात्मिक मूल्यांत जाण्याचा सोपा, सरळ आणि कुणालाहि चालून जातां येईल असा मार्ग आहे.

पूर्वीं याच दृष्टीनें स्त्रियांचाहि उपनयन संस्कार करण्यांत येत असे. आज पुरुषांचाहि होत नाहीं ! आणि ज्या थोड्या ठिकाणीं हा संस्कार 'उरकण्यांत' करण्यांत येतो तिथें त्याचा कार्य-कारणभाव कुणालाच माहीत नसतो. श्री. वझे यांनीं या दृष्टीनें अत्यन्त सोप्या, सुबोध रीतीनें व मुख्य विषयाला बाध येऊं न देतां हा विषय या छोट्याशा पुस्तकांत मांडला आहे त्याचें महत्त्व फार आहे. वैज्ञानिक विचिकित्सा नसली तरी संस्काराची ओळख चांगली व्हावी असा यांत प्रयत्न आहे. तो चांगला साधला असून माझ्या मतें या विषयावर त्यांनीं लिहिलें हेंच आधीं महत्त्वाचें आहे. यासाठीं ते व प्रकाशक या दोघांनाहि मी मनापासून धन्यवाद देतों.

पुस्तकाचें अंतरंग पकड घेईल व शेवटपर्यंत बालवाचक त्यांत रंगून जाईल असेंच आहे. कांहीं कांहीं भाग बहारीचा आहे. मुलांच्या अबोध मनाला संस्काराचें वळण लावूं इच्छिणाऱ्यांनीं या पुस्तकाचा अवश्य लाभ घेऊन लेखकाला अधिक प्रोत्साहित करावें यापेक्षां या वेळीं अधिक तें काय लिहिणार ? – इति लेखनसीमा.

**पं. 'मीमांसातीर्थ' श्रीपादशास्त्री किंजवडेकर**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 2610 नों. दि. ........
वि. [illegible] क्र. ........
अनुक्रम [illegible]
विभाग [illegible]
क्रमांक [illegible]
नों. दि. [illegible]
वाचनालय शाखा.
IRIBK-01097880

卐

युवा स्यात् साधु युवाध्यायकः । आशिष्ठो द्रढिष्ठो बलिष्ठः ।
तस्येयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् ।

卐